राज्य माहिती आयोग व राज्य सेवा हक्क आयोगातील गट 'अ' व गट 'ब' संवर्गातील पदे भरण्याबाबत सर्वसमावेशक धोरण.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्रमांक: साप्रवि-१२०२२/२६/२०२६/(भाग-१) साप्रवि (कक्ष-६)

१९ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

दिनांक : ०४ नोव्हेंबर २०२६.

संदर्भ :- १ सा.प्र.वि,शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/कार्या-१२, दि.१७ डिसेंबर, २०१६.
२.सा.प्र.वि,शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.५१०/कार्या-१२, दि. १६ फेब्रुवारी, २०१८.
३.सा.प्र.वि, शासन निर्णय क्र.आरटीएस-२०२१/प्र.क्र.११/लेदिक,दि. ०८ जून, २०२३
४.सा.प्र.वि,शासन निर्णय क्र. रामाआ-२०१७/प्र,क्र.१०/सहा, दि. २१ जून, २०२३
५.सा.प्र.वि,शासन निर्णय क्र.साप्रवि/६१/२०२५/साप्रवि/लोदिक, दि. २४ एप्रिल, २०२५.
६.सा.प्र.वि,शासन निर्णय क्र.१२०२२/१५/२०२५/साप्रवि/सहा,दि. ३१ जुलै, २०२५.
७.सा.प्र.वि,शासन निर्णय क्र सीबीई-१५२५/प्र.क्र.३७/आस्थामं/कार्या-१३, दि.१०.०६.२०२५
८.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०३ सप्टेंबर, २०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

प्रस्तावना :

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्रमांक ३ येथील दिनांक ०८ जून, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्य सेवा हक्क आयोगाचा आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे. तसेच, सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्रमांक ४ येथील २१ जून, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्य माहिती आयोगाचा आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे. उपरोक्त शासन निर्णयान्वये दोन्ही आयोगांतील **गट 'अ' व गट 'ब'** संवर्गातील पदे संबंधित संवर्ग नियंत्रक प्राधिकरणामार्फत प्रतिनियुक्तीद्वारे भरण्याची तरतूद करण्यात आली होती. त्यानंतर सदर धोरणांमध्ये सुधारणा करण्यात आली असून संदर्भ क्रमांक ५ येथील दि. २४ एप्रिल, २०२५ च्या शासन निर्णयान्वये राज्य सेवा हक्क आयोगातील तसेच संदर्भ क्रमांक ६ येथील दि. ३१ जुलै २०२५ च्या शासन निर्णयान्वये राज्य माहिती आयोगातील पदे मंत्रालयीन संवर्गातील अथवा शासनाच्या कोणत्याही कार्यालयातील समकक्ष पद धारण करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीद्वारे भरण्याची तरतूद करण्यात आली आहे.

२. उपरोक्त शासन निर्णयानुसार वेळोवेळी जाहिरात प्रसिद्ध करूनही प्रतिनियुक्तीसाठी मंत्रालयीन संवर्गातील तसेच क्षेत्रीय संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून अपेक्षित प्रतिसाद प्राप्त न होणे आणि संबंधित प्रशासकीय विभागांकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त होण्यास विलंब होणे अथवा ना-हरकत प्रमाणपत्र उपलब्ध न होणे, यामुळे दोन्ही आयोगांतील मंजूर पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त राहिलेली आहेत. परिणामी, आयोगांच्या नियमित कामकाजावर तसेच प्रकरणांच्या निपटाऱ्यावर प्रतिकूल परिणाम होत आहे.

३. या पार्श्वभूमीवर राज्य माहिती आयोग तसेच राज्य सेवा हक्क आयोगातील रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया अधिक सुलभ, गतिमान व परिणामकारक करण्यासाठी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०३ सप्टेंबर, २०२६ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयांच्या अनुषंगाने राज्य माहिती आयोग व राज्य सेवा हक्क आयोगातील **गट 'अ' व गट 'ब'** संवर्गातील पदे भरण्याबाबत सर्वसमावेशक धोरण निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या अनुषंगाने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

<u>शासन निर्णय</u> :

राज्य माहिती आयोग तसेच राज्य सेवा हक्क आयोगातील **गट 'अ' व गट 'ब'** संवर्गातील रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया अधिक सुलभ व गतिमान करण्यासाठी पुढीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यात येत आहे.

१. जाहिरात प्रसिद्ध करणे व प्रतिनियुक्तीची कार्यवाही:

१.१ राज्य माहिती आयोगातील तसेच राज्य सेवा हक्क आयोगातील **गट 'अ' व गट 'ब'** संवर्गातील पदे प्रतिनियुक्तीद्वारे भरण्यासाठी मंत्रालयीन संवर्गातील व क्षेत्रीय संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून इच्छुकता मागविण्याकरिता जाहिरात प्रसिद्ध करण्याची कार्यवाही यापुढे अनुक्रमे सामान्य प्रशासन विभागातील माहिती (कार्यासन-६) व लोकशाही दिन (लोदिक) या कार्यासनामार्फत करण्यात यावी.

१.२ राज्य माहिती आयोगातील पदांच्या भरतीसाठी मंत्रालयीन तसेच क्षेत्रीय संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून इच्छुकता मागविणे, प्राप्त अर्जांची छाननी करणे व प्रतिनियुक्तीने नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्याबाबतची कार्यवाही माहिती (कार्यासन-६) या कार्यासनामार्फत करण्यात यावी. तसेच, राज्य सेवा हक्क आयोगातील पदांच्या भरतीसाठी सदर कार्यवाही लोकशाही दिन (लोदिक) या कार्यासनामार्फत करण्यात यावी.

१.३ उपरोक्त दोन्ही कार्यासनांनी पदभरतीची प्रक्रिया विहित प्रतिनियुक्ती धोरणातील इतर लागू अटी व शर्तींच्या अधीन राहून पार पाडावी.

२. संबंधित प्रशासकीय विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्याबाबतची कार्यपद्धती:

२.१ राज्य माहिती आयोग अथवा राज्य सेवा हक्क आयोगातील पदभरतीसाठी जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर ईच्छुक अधिकारी कर्मचारी यांनी त्यांचा अर्ज त्यांच्या प्रशासकीय विभागामार्फत प्रधान सचिव (प्र.ना.उ व सु) सामान्य प्रशासन विभाग यांना सादर करावा. तसेच सदर अर्जाची अगाऊ प्रत कार्यासन-माहिती व कार्यासन-लोदिक, सामान्य प्रशासन विभाग यांना सादर करावी.

२.२ राज्य माहिती आयोग अथवा राज्य सेवा हक्क आयोगामध्ये प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी इच्छुक असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांची इच्छुकता संबंधित प्रशासकीय विभागास प्राप्त झाल्यानंतर संबंधित प्रशासकीय विभागाने सदर अधिकारी/कर्मचारी यांच्या अर्जासोबत विहित नमुन्यातील आवश्यक माहिती व ना-हरकत प्रमाणपत्र ३० दिवसांच्या आत सामान्य प्रशासन विभागास सादर करणे आवश्यक राहील.

२.३ संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना प्रतिनियुक्तीने पाठविण्यास संबंधित प्रशासकीय विभागाची सहमती नसल्यास, सदर विभागाने त्याबाबतची वस्तुनिष्ठ कारणे नमूद करून ना-हरकत प्रमाणपत्र न देण्याचा प्रस्ताव ३० दिवसांच्या आत मा. मुख्य सचिव यांची मान्यता घेऊन सामान्य प्रशासन विभागास सादर करणे बंधनकारक राहील.

२.४ संबंधित प्रशासकीय विभागाकडून उपरोक्त ३० दिवसांच्या विहित कालावधीत ना-हरकत प्रमाणपत्र अथवा सदर प्रमाणपत्र नाकारण्याबाबतचे पत्र सामान्य प्रशासन विभागास प्राप्त न झाल्यास संबंधित विभागाची सहमती आहे असे गृहीत धरून (Deemed Approval) माहिती (कार्यासन-६) अथवा लोकशाही दिन (लोदिक) या कार्यासनाने प्रतिनियुक्तीबाबत पुढील आवश्यक कार्यवाही करावी.

३. सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा उपलब्ध करून घेण्याबाबत :

३.१ सा.प्र.वि, शासन निर्णय क्र. सीबीई-१५२५/प्र.क्र.३७/आस्थामं/कार्या-१३, दि.१०.०६.२०२५ अन्वये शासनाच्या विद्यमान धोरणानुसार मंजूर पदसंख्येच्या १० टक्के मर्यादेत विवक्षित कामासाठी सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा उपलब्ध करून घेण्याची तरतूद आहे. सदर धोरणानुसार राज्य माहिती आयोग व राज्य सेवा हक्क आयोगामध्ये सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा उपलब्ध करून घेण्याची व्यवस्था कायम राहील.

३.२ उपरोक्त १० टक्के व्यतिरीक्त राज्य माहिती आयोग तसेच राज्य सेवा हक्क आयोगातील **गट 'अ' व गट 'ब'** संवर्गातील पदांची मोठ्या प्रमाणावरील रिक्तता आणि सदर पदे प्रतिनियुक्तीद्वारे भरण्यासाठी येणाऱ्या अडचणी विचारात घेता, विशेष बाब म्हणून दोन्ही आयोगांतील मंजूर पदांच्या ५० टक्के मर्यादेत सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा नियमित पदावरील नियमित कामकाजासाठी (आहरण व संवितरण अधिकारी वगळून) उपलब्ध करून घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३.३ सदर मान्यता ही राज्य माहिती आयोग व राज्य सेवा हक्क आयोगातील नियमित पदे विहित मार्गाने भरण्यात येईपर्यंतच लागू राहील. त्यानुषंगाने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना नियमित पदावर कंत्राटी तत्वावर नियुक्ती आदेश देतांना त्यांच्या सेवेचा कालावधी "एक वर्ष किंवा सदर पद विहीत मार्गाने भरले जाईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तो पर्यंत राहील" अशी स्पष्ट अट नियुक्ती आदेशात टाकण्यात यावी.

३.४ सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा उपलब्ध करून घेताना त्यांची पात्रता, अनुभव, सेवांची आवश्यकता, मानधन व नियुक्तीच्या अटी व शर्ती सा.प्र.वि, शासन निर्णय क्र. सीबीई-१५२५/ प्र.क्र.३७/ आस्थामं/ कार्या-१३, दि.१०.०६.२०२५ अन्वये निश्चित केलेल्या शासनाच्या धोरणानुसार राहतील.

४. उपरोक्त धोरणानुसार राज्य माहिती आयोग व राज्य सेवा हक्क आयोगातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही अनुक्रमे सामान्य प्रशासन विभागातील माहिती (कार्यासन-६) व लोकशाही दिन (लोदिक) या कार्यासनांनी कालबद्ध पद्धतीने करावी. तसेच प्रतिनियुक्तीने नियुक्तीच्या प्रक्रियेमध्ये संबंधित प्रशासकीय विभागांकडून विहित कालमर्यादेत कार्यवाही होईल, याची दक्षता घ्यावी.

५. सदर शासन निर्णयातील तरतुदी **राज्य माहिती आयोग तसेच राज्य सेवा हक्क आयोगातील गट 'अ' व गट 'ब' संवर्गातील पदे भरण्यापुरत्या मर्यादित राहतील**. इतर प्रशासकीय विभाग व त्यांच्या अखत्यारीतील क्षेत्रिय कार्यालयामधील प्रतिनियुक्तीने पद भरतीसाठी शासनाचे विद्यमान धोरण लागू राहील.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६११०४१५५३४०९७०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

BHARATI DINESH DHURI

Digitally signed by BHARATI DINESH DHURI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD IT, 2.5.4.20=AC65E55BC2F86EC37C6F25108B6605BC20E71B4742DD20D7E8F5E14CDA6A2A7F, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6B3C122EDC26AC3532130D69CD06C9664E8A139B9A532752E240A4851A8C9D3C, cn=BHARATI DINESH DHURI
Date: 2026.11.04 15:54:30 +05'30'

(भारती दि.धुरी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत :

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव (प्र.ना.उ. व सु.), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. राज्य मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, मुंबई.
८. राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग, मुंबई.
९. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव.
१०. सर्व विभागीय आयुक्त.
११. सर्व जिल्हाधिकारी.
१२. सर्व संबंधित संवर्ग नियंत्रक प्राधिकारी.
१३. माहिती (कार्यासन-६), सामान्य प्रशासन विभाग.
१४. लोकशाही दिन (लोदिक), सामान्य प्रशासन विभाग.